# जाहीरनामा

## उपविभागीय दंडाधिकारी औरंगाबाद यांचे कार्यालय औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद

## पोलीस पाटील पदभरतीसाठी जाहीरनामा -2015

**जाहीरात क्र.02 /2016**

**दि.19 जानेवारी 2016 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला जाहीरनामा रद्द करण्यात येऊन सुधारित जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद जिल्हायातील औरंगाबाद उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी त्याच्या कार्यक्षेत्रातील गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अहर्ताधारक व्यक्तीकडुन विहित नमुन्यात फक्त ऑनलाइन पध्दत्तीने http://184.95.41.73/AugPPया संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.**

| ऑनलाइन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम मुदत | परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत | | संकेतस्थळावर प्रवेशपत्र प्रसिध्द करणे | परिक्षेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | बॅंक चालान व्दारे | पात्र /अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | | |
| दि. 25/01 /2016 रोजी स.12.00 वा.पासून | दि. 08/02/2016 सांय 5.45 वा.पर्यंत | दि. 09/02 /2016 बॅंक वेळेत | दि. 11 /02 /2016 सांय 6.00 वा.पर्यंत | दि. 24/02/2016 दु.3.00 वाजता | दि. 28/02/ 2016 दु.12 ते 1.30 वा. |

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात **http://184.95.41.73/AugPP** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपुर्वक समजून ऑनलाइन पध्दत्तीने अर्ज सादर करावेत व प्रिंट आऊट काढुन घ्यावी. प्रस्तूत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावर विहित ऑनलाइन पदध्त्तीने भरलेले अर्ज व विहित चलनाव्दारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज/शुल्क स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अदयावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे,अशंत: बदल करणे,पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रकिये संदर्भात वाद,तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी उपविभागीय दंडाधिकारी,औरंगाबाद यांनी राखून ठेवले असुन त्यांचा निर्णय अंतिम असेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

| संवर्ग | आरक्षणानुसार भरावयाची एकूण रिक्त पदे | महिला आरक्षीत पदे | महिला आरक्षणा व्यतीरिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| अनुसूचित जाती | 10 | 03 | 07 | सदर पदाचा तपशिल (संबधीत गावाला कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण / महिला आरक्षण इत्यादी सविस्तर माहिती) अटी,शर्ती अर्ज अनुषंगीय माहिती व विस्तृत जाहिरात http://184.95.41.73/AugPP या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| अनुसूचित जमाती | 07 | 02 | 05 | |
| विमुक्त जाती-अ | 04 | 01 | 03 | |
| विमुक्त जाती-ब | 02 | 01 | 01 | |
| विमुक्त जाती-क | 02 | 01 | 01 | |
| विशेष मागास प्रवर्ग | 03 | 01 | 02 | |
| इतर मागासवर्ग | 19 | 06 | 13 | |
| खुला | 41 | 12 | 29 | |
| एकूण | 88 | 27 | 61 | |

दिनांक 22/01/2016

( शशिकांत हदगल )
उपविभागीय दंडाधिकारी,औरंगाबाद
तथा अध्यक्ष
(पो.पा.भरती-2015 निवड समिती)

# प्रवर्ग निहाय रिक्त जागांचे परिशिष्ट

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | आरक्षणाचा प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | घारेगांव एकतूनी | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| 2 | कृष्णापूरवाडी | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| 3 | शेंद्रा बन | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| **4** | **महालपिंप्री** | **औरंगाबाद** | **अनुसूचित जाती** | **महिला** |
| **5** | **गोलवाडी** | **औरंगाबाद** | **अनुसूचित जाती** | **महिला** |
| 6 | कनकोरा | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| **7** | **कुंभेफळ** | **औरंगाबाद** | **अनुसूचित जाती** | **महिला** |
| 8 | खामखेडा | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| 9 | तुळजापूर | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| 10 | माळीवाडा | औरंगाबाद | अनुसूचित जाती | नाही |
| 11 | उचलती | औरंगाबाद | अनुसूचित जमाती | नाही |
| **12** | **केसापुरी** | **औरंगाबाद** | **अनुसूचित जमाती** | **महिला** |
| 13 | कच्छीघाटी | औरंगाबाद | अनुसूचित जमाती | नाही |
| 14 | मलाकापूर | औरंगाबाद | अनुसूचित जमाती | नाही |
| 15 | चौका | औरंगाबाद | अनुसूचित जमाती | नाही |
| 16 | इस्लामपुरवाडी | औरंगाबाद | अनुसूचित जमाती | नाही |
| **17** | **रामपूर** | **औरंगाबाद** | **अनुसूचित जमाती** | **महिला** |
| 18 | गिरनेरा | औरंगाबाद | विमुक्ती जाती-अ | नाही |
| 19 | रहाळपटटी तांडा | औरंगाबाद | विमुक्ती जाती-अ | नाही |
| **20** | **बेंबळयाची वाडी** | **औरंगाबाद** | **विमुक्ती जाती-अ** | **महिला** |
| 21 | हिरापुर | औरंगाबाद | विमुक्ती जाती-अ | नाही |
| **22** | **निपाणी** | **औरंगाबाद** | **भटक्या जमाती-ब** | **महिला** |
| 23 | तिसगांव | औरंगाबाद | भटक्या जमाती -ब | नाही |
| **24** | **परदरी** | **औरंगाबाद** | **भटक्या जमाती-क** | **महिला** |
| 25 | आडगांव बु. | औरंगाबाद | भटक्या जमाती-क | नाही |
| **26** | **पांढरी पिंपळगांव** | **औरंगाबाद** | **विशेष मागासवर्ग** | **महिला** |
| 27 | डायगव्हाण | औरंगाबाद | विशेष मागासवर्ग | नाही |
| 28 | हिवरा | औरंगाबाद | विशेष मागासवर्ग | नाही |
| 29 | चिंचोली | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 30 | का-होळा | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 31 | शेकटा | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 32 | बाळापूर | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 33 | गाढेजळगांव | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| **34** | **हासनाबादवाडी** | **औरंगाबाद** | **इतर मागास वर्ग** | **महिला** |
| 35 | शेवगा | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 36 | शेंद्राकमंगर | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| **37** | **भिकापूर** | **औरंगाबाद** | **इतर मागास वर्ग** | **महिला** |
| 38 | सटाणा | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 39 | शरणापूर | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **40** | **चारठा** | **औरंगाबाद** | **इतर मागास वर्ग** | **महिला** |
| **41** | **शेलुद** | **औरंगाबाद** | **इतर मागास वर्ग** | **महिला** |
| **42** | **कचनेर** | **औरंगाबाद** | **इतर मागास वर्ग** | **महिला** |
| 43 | कौडगांव जालना | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 44 | कोळघर | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 45 | आडगांव सरक | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| **46** | **गंगापूर जहागिंर** | **औरंगाबाद** | **इतर मागास वर्ग** | **महिला** |
| 47 | नायगव्हाण | औरंगाबाद | इतर मागास वर्ग | नाही |
| 48 | नायगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 49 | लाडगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 50 | टाकळी माळी | औरंगाबाद | खुला | नाही |
| 51 | पळशी | औरंगाबाद | खुला | नाही |
| 52 | जडगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 53 | बनगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 54 | धोंडखेडा | औरंगाबाद | खुला | नाही |
| 55 | पिसादेवी | औरंगाबाद | खुला | नाही |
| 56 | सिंदोन | औरंगाबाद | खुला | नाही |
| 57 | आडगांव माहोली | औरंगाबाद | खुला | नाही |
| 58 | पाचोड | औरंगाबाद | खुला | नाही |
| 59 | वळदगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 60 | सय्यदपूर | औरंगाबाद | खुला | नाही |
| 61 | वाहेगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 62 | गाडीवाट | औरंगाबाद | खुला | नाही |
| 63 | मंगरुळ | औरंगाबाद | खुला | नाही |
| 64 | जयपुर | औरंगाबाद | खुला | नाही |
| 65 | चितेगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 66 | रामपूरी | औरंगाबाद | खुला | नाही |
| 67 | औरंगपूर | औरंगाबाद | खुला | नाही |
| 68 | दरेगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 69 | सारोळा | औरंगाबाद | खुला | नाही |
| 70 | आपतगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 71 | मुर्शदपूर | औरंगाबाद | खुला | नाही |
| 72 | लायगांव | औरंगाबाद | खुला | नाही |
| 73 | शिवगडतांडा | औरंगाबाद | खुला | नाही |
| 74 | वंजारवाडी | औरंगाबाद | खुला | नाही |
| 75 | पिरवाडी | औरंगाबाद | खुला | नाही |
| 76 | टाकळी शिंपी | औरंगाबाद | खुला | नाही |
| **77** | **पिंपळखुटा** | **औरंगाबाद** | **खुला** | **महिला** |
| **78** | **वरझडी** | **औरंगाबाद** | **खुला** | **महिला** |
| **79** | **खोडेगांव** | **औरंगाबाद** | **खुला** | **महिला** |
| **80** | **मोरहिरा** | **औरंगाबाद** | **खुला** | **महिला** |
| **81** | **कासनापूर** | **औरंगाबाद** | **खुला** | **महिला** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 82 | गारखेडा | औरंगाबाद | खुला | महिला |
| 83 | गोलटगांव | औरंगाबाद | खुला | महिला |
| 84 | आडगांव खुर्द | औरंगाबाद | खुला | महिला |
| 85 | जोडवाडी | औरंगाबाद | खुला | महिला |
| 86 | बोरवाडी | औरंगाबाद | खुला | महिला |
| 87 | गोपाळपूर | औरंगाबाद | खुला | महिला |
| 88 | काद्राबाद | औरंगाबाद | खुला | महिला |

## किमान आवश्यक अर्हता:-

खाली नमुद केलेले शैक्षणिक अर्हता 31/12/2015 या दिनांकास प्रमाणपत्रासहित पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | संवर्ग (पदनाम) | किमान आवश्यक अर्हता |
|---|---|---|
| 1 | पोलीस पाटील | 1. अर्जदार महाराष्ट्र राज्य शालांत परिक्षेत (एस.एस.सी) उत्तीर्ण असावा.<br>2. (अ) वयोमर्यादे करिता अर्जदाराचे दि. 25/01/2016 रोजी वय विचारात घेतले जाईल (ब) अर्जदारांचे वय दिनांक 25/01/2016 रोजी 25 वर्षापेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.(क) पोलीस पाटील पदाकरिता वयोमर्यादा शितीलक्षम नाही.<br>3. अर्जदार संबधीत गावाचा स्थानीक व कायम रहिवाशी असावा तसेच त्याची संबधीत गावात स्थावर मालमत्ता असावी.<br>4. अर्जदार शारीरीक दृष्टया सक्षम असावा. व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असने आवश्यक आहे.<br>5. महारष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञा पत्र )नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनाकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत)<br>6. मागास प्रवगासाठी आरक्षित पदाकरिता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिका-याने निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>7. मागास प्रवर्गातील अर्जदार (विजाअ,भजब,भजक,विमाप्र व इ.मा.व.)यांना सन 2015-16 कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलीयर)यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन- क्रिमीलीयर)प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>8. राखीव महिला पदासाठी अर्ज सादर करणा-या महिला अर्जदाराला 2015-16 या कालावधीकरीता वैध असलेले उतपन्न आणी प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलीयर)यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन- क्रिमीलीयर)प्रमाणपत्र आपश्यक राहील. |

## परिक्षेचे स्वरूप:-

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस पाटील | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा (मुलाखत) | एकूण गुण |
| | | 80 | 20 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप साधारणपणे खालील प्रमाणे राहील.**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणाची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहिल.
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ट व बहूपर्यायी स्वरूपाची असेल.
3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस.एस.सी) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानीक परिसरची माहिती व चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4. लेखी परिक्षेत एकूण 80 गुणापैकी किमाण 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चत्तम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ दि.16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.

## <u>निवड कार्यपध्दती, अटी, शर्ती</u>

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस शैक्षणिक पात्रता व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा तोंडी परिक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2. लेखी परिक्षा, तोंडी परिक्षा, कागदपत्रे छाननी इत्यादि करिता प्रवेश पत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुन उपलब्ध करण्यांत येतील. पोष्टाद्वारे पाठविण्यांत येणार नाहीत. सबब सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्यावत व सजग राहण्याची प्रवेश पत्र डाऊन लोड करुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.
3. लेखी परिक्षा अंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती याच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्या करिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यांत येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क मुळ कागदपत्राच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भ्ंरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरिता करण्यांत येईल. जाहीरातीत नमुद केलेली संपूर्ण अर्हता ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादिसारख्या सवलती नामंजूर करण्यांत येतील. यची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.
4. अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, यांचे अथवा वरिष्ठा वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणीअंतीच निश्चित करण्यांत येईल.
5. अर्जदारांचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6. अर्जदार कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसावा. अर्जदार हा नेमणुकीच्या गांवी स्थानिक स्वरुपाचा उद्योग करणारा नसावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी वा धंदा करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा. अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा. याबाबतचे रु.100/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
7. पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरिता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसांने अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यांत येईल. परंतू याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यांत प्राधान्य देण्यांत येंईल. परंतू तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवाप्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यांत आलेल्या सुधारणानुसार त्या गांवासाठी ठरविण्यांत आलेल्या सामाजिक समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

8. अर्जदार संबंधित गावाचा स्थानिक व कायमचा रहिवाशी असणे आवश्यक असून संबंधित गांवात अर्जदाराची स्थावर मालमत्ता आहे किंवा कसे याचा विचार करण्यांत येईल.
9. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक/ कायमचा रहिवाशी असू शकतो. सबब अर्जदारांने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यांत येतील.
10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षित करण्यांत आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासूनच अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये)
11. संपूर्ण औरंगाबाद जिल्हयात सर्व उपविभागासाठी एकाच दिवशी एकाच वेळी परिक्षा घेण्यांत येईल.
12. संपूर्ण भरती प्रक्रिया गांवनिहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकाशी संबंध नसेल.
13. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
14. पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field Work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यांत आलेले नाही.
15. पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.
16. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी/ 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दिनांक 12/12/2011 मधील तरतूदीनुसार याचिका क्र.2136/2011 मध्ये दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवि दिल्ली येथे दाखल केलेल्या एस.एल.पी. मधील आदेशाच्या अधिन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यांत येईल.
17. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.08) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलियर) तत्वत: विमुक्त जाती, भटक्या जमाती(अ,ब,क,ड), विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील अर्जदाराकडे दि.31 मार्च 2016 पर्यन्त वैध असलेले नॉनक्रिमिलियरचे तत्वत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील. तसेच त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.
18. शासन, महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.82/2001/मसेआ/2000/ प्र.क्र.415/का-2, दि.25/5/2001 आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या महिला अर्जदारांनी सन 2015-16 या कालावधीकरिता दिनांक 31/3/2016 पर्यन्त वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलियर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

19. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/ 12, दिनांक 28/3/2005 व क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/ 12, दिनांक 1/7/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/3/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणा-या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**20.** लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारांस पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यांत येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस हजर राहणे अनिवार्य राहील. तोंडी परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा अर्जदार पोलीस पाटील पदांवरील निवडीकरिता पात्र राहील.

**21.** समान गुण मिळाल्यास अंतिम निवड :- शासन निर्णय क्र.डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र. 592/पोल-8, दिनांक 22/8/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

(1) पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर

(2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर

(3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर

(4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

# पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि त्यांची दोन मुले यांचा समावेश, त्याव्यक्तिरिक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.

22. या शिवाय महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम 1967 व त्यास सलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

23. हा जाहीरनामा प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यांत येईल.

## ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत

1. प्रस्तुत पदाकरीता फक्त **http://184.95.41.73/AugPP** या अधिकृत संकेतस्थळावरुन विविध पध्दत्तीने भरलेले ऑन लाईन पध्दत्तीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑन लाईन अर्जात नोंदवीलेला ई मेल आयडी व मोबाईल क्र. चुकीचा /अपूर्ण तसेच मोबाईल क्र. NCPR रजिस्टर्ड ( DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रीया दरम्यान त्याव्दारे पाठवील्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवाराना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई मेल आयडी व मोबाईल संदेश वाहनात येणा-या तांत्रिक अडचणीना जिल्हा निवड समिती, औरंगाबाद जबाबदार असनार नाहीत.सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अदयावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
2. पात्र उमेदवारांना वेब- बेस्ड ( Web-Based) ऑन लाईन अर्ज http://184.95.41.73/AugPPया संकेतस्थळाव्दारेदि. 21/01/2016 ते 06/02/2016 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
3. उमेदवारांचे अर्ज ऑन लाईन ( Online) पध्दत्तीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणीक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापी, ऑन अर्जामध्ये उमेदवारांने पात्रतेनुसार कागळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑन लाईन पध्दत्तीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑन लाईन अर्जात एकदा भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहीरातीत नमुद केलेल्या सर्व अटी तपासूनच ऑन लाईन अर्ज भरावा.
4. उमेदवारांची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑन लाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रेतेनूसार कोणतेही कागदपत्रे पूर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करता येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमीक चाळणीनुसार गूणवत्तेच्या आधारे उमेदवारांने ऑन लाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या

कागदपत्रांची सखोल छानणी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता न धारण करणा-या उमेदवाराना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार पो.पा.भरती निवड समिती, औरंगाबाद यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत. व याबाबत उमेदवारास कोणतेही तक्रार करता येणार नाही.

5. ऑन लाईन पधदत्तीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना http://184.95.41.73/AugPPया संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑन लाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ हैद्राबाद बँकेत फी भरल्याचे चलन दोन प्रतिमध्ये ( उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हानिवड समिती औरंगाबाद प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची पिंट काढुन त्या चलनामार्फतच उमेदवाराला चलनात नमूद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या तीन प्रतिपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व पो.पा.भरती निवड समिती, औरंगाबाद प्रत स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या बँकेकडून परत मिळेल त्यापैकी पो.पा.भरती निवड समिती, औरंगाबाद प्रत उमेदवारानी कागदपत्र छानणीचे वेळी निवड समिती औरंगाबाद यांचेकडे जमा करावी. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराच्या कागदपत्राची छानणी केली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दि. 08/02/2016 हा राहील व या दिनांकानंतर बँकेत परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.

6. उमेदवाराने स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर त्याची स्थिती http://184.95.41.73/AugPPया संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

7. ऑन लाईन पध्दत्तीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा चालु ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्र व्यवहार उमेदवाराने ऑन लाईन अर्जात नोंदवीलेल्या ई-मेल आयडी व्दारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदवीणे आवश्यक आहे. व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वत्:चा अदयावत ( Latest ) विहीत नमुण्यातील पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करून http://184.95.41.73/AugPP या संकेतस्थळावरील सूचने नुसार विहीत पध्दत्तीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

8. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

9. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरूण विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारंची स्थिती, परिक्षेचे रूपरेषा / वेळापत्रक / परिक्षा केंद्र / बैठक इ.बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वंतत्र्य पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अदयावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

10. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस / कागपपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्पयावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष् / अप्रत्यक्ष् दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रकियेतून बाद करण्यात येईल. तसेच , नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचनाय न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

11. अपात्र अर्जदारास स्वतंत्र्यरित्या कळविले जाणार नाही.

12. परीक्षेस / कागदपत्र पडताळणी / तोंडी मुलाखतीस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

13. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये कोणताही प्रश्न चुकीचा आढळल्यास लेखी परिक्षेच्या दिवशी संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप निवड समिती औरंगाबाद यांचेकडे नोदंवावे लागेल. तसेचलेखी परिक्षेच्या दिवशी संध्याकाळी वेब साईटवर आदर्श उत्तरपत्रिका (Answer Key) प्रकाशीत करण्यात

येईल. त्यावरील आक्षेप एक दिवसाच्या आत लेखी स्वरूपात निवड समिती औरंगाबादकडे नोदंवावी लागेल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. हरकतीनुसार तथ्य असल्यास (Answer Key) सुधारीत करण्यात येईल. याबाबत निवड समितीचा औरंगाबाद यांचा निर्णय अंतिम राहिल.

**परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे शुल्क विहित पध्दतीने भरावे लागेल.**

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग- रूपये 500/- | 1) चालान व्दारे भरल्यास बँकेत ठरविलेले बँक चार्जेस जादा लागतील |
| मागासप्रवर्ग - रूपये 300/- | 2) Online पध्दतीने शुल्क भरल्यास ते ग्राहय धरण्यांत येणार नाहीत. |

15 ) सदर पदभरती प्रक्रियाबाबत काही तक्रार असल्यास किंवा अर्ज भरताना अडचणी उदभवल्यास, हॉल तिकीट (प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी इत्यादी तत्सम बाबीसाठी **9769199421 / 9769449644**या दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते 06.00 पर्यत संपर्क साधावा.

**पात्र / अपात्र यादी प्रसिध्द करणे व प्रवेशपत्र प्राप्त करण्याचा कालबध्द कार्यक्रम**

| अ.क्र. | पदाचे नांव | पात्र / अपात्र उमेदवारांची यादी ऑनलाईन प्रसिध्द करणे | उमेदवार ऑनलाईन प्रवेशपत्र प्राप्त करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | पोलीस पाटील | 11/2/2016 | 24/2/2016 पासून |

अपात्र उमेदवारांना हरकती दिनांक 12/2/2016 ते दिनांक 15/2/2016 पर्यतच्या कालावधीत घेता येईल त्यानंतर प्राप्त आक्षेप / हरकतीच्या विचार केला जाणार नाही.प्रवेशपत्र (हॉलतिकीट) पोस्टाने पाठविले जाणार नाही.याची नोंद घ्यावी. उमेदवराने स्वत: विहीत वेळेत आपले प्रवेशपत्र (हॉलतिकीट) डाऊनलोड करुन प्रिंट करावी.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | भरती पक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 25/1/2016 (सकाळी 12.00 पासून) ते दिनांक 8/2/2016 (सायकांळी 05.45 पर्यत) |
| 2 | बँकेत विहीत चालनव्दारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | 9/2/2016 (बँक वेळेत) |
| 3 | संकेतस्थळावर प्रवेशपत्र प्रसिध्द करणे | 24/2/2016 दुपारी 03.00 वा |
| 4 | परीक्षेचा दिनांक व वेळ | दिनांक 28/2/2016 दुपारी 12.00 ते दुपारी 1.30 |

**दिनांक :-22/01/2016**

**(शशिकांत हदगल)**
**उप विभागीय दंडाधिकारी, औरंगाबाद तथा**
**अध्यक्ष**
**(पो.पा.पदभरती 2015-2016 निवड समिती औरंगाबाद)**